# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## मुक्त अध्ययन प्रशाळा

## सर्वसाधारण सूचना

मुअप्र/२०२०-२१/०६, दिनांक-३०/०५/२०२०

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., आणि एम.कॉम. या अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण सूचना.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त अध्ययन प्रशाळा विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दूरस्थ शिक्षणप्रणालीनुसार प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., आणि एम. कॉम. या अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येईल. प्रवेश प्रक्रीयेमध्ये प्रथम प्रवेश घेणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर प्रवेश देण्यात येतील. ऑनलाईन प्रवेशअर्ज भरताना विद्यार्थ्यांजवळ खालील कागदपत्रांची स्कॅन कॉपी असणे आवश्यक आहे.

१. स्वत:चा फोटो (पासपोर्ट आकार)
२. सहीचा नमुना
३. आधार कार्ड
४. प्रवेशास आवश्यक असणारी पात्रता दर्शवणारी गुणपत्रिका
५. स्थानांतर प्रमाणपत्र/स्थलांतर प्रमाणपत्र (किंवा यासाठी अर्ज केला असल्यास त्याची प्रत)

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याकडे वरील सर्व कागदपत्रे असल्यास विद्यार्थी प्रवेशअर्ज भरण्यास पात्र राहील.

ऑनलाईन प्रवेशअर्ज प्रक्रीयेसंदर्भातील सूचना विद्यार्थ्यांना मुक्त अध्ययन प्रशाळा विभागाचे संकेतस्थळ http://unipune.ac.in/sol यावर उपलब्ध होईल. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना काही प्रश्न किंवा शंका असल्यास त्याबाबतची प्रश्नोत्तरीक माहिती विभागाच्या संकेतस्थळावरील Admissions for Academic Year 2020-21 आणि Student Corner मधील Frequently Asked Questions येथे क्लिक करून मिळेल.

संचालक,
मुक्त अध्ययन प्रशाळा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ